क्र.साप्रवि/रवका/न.क्र.५/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबइ - ४०० ०१९.

महावितरण

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ३७ दिनांक १९/०४/२००६

**विषय :** नक्षलग्रस्त म्हणून घोषित झालेल्या गोंदिया तालुक्यात कार्यरत असलेल्या महावितरण कंपनीतील कर्मचारी/अधिकारी यांना प्रोत्साहन भत्ता व इतर सवलती लागू करणेबाबत.

**संदर्भ :**
१) स.सा.आदेश क्र.१२०(क),दि.१/७/१९८९.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.३७८ दि.२९/१/२००३ व त्यासोबतचा शासन निर्णय दि.६/८/२००२.
३) शासनाच्या ऊर्जा विभागाचे पत्र दि.१६/९/२००४.
४) या कार्यालयाचे पत्र क्र.साप्रवि/रवका/२६६६६, दि.१.१०.२००४.
५) गृह विभागाचा शासन निर्णय दि. ७/१२/२००४.
६) शासनाच्या ऊर्जा विभागाचे पत्र दि.२३/२/२००५.
७) या कार्यालयाचे पत्र क्र.साप्रवि/रवका/७५४ दि. १८/३/२००५.
८) गृह विभागाचा शासन निर्णय दि. २०/५/२००५.
९) शासनाच्या ऊर्जा विभागाचे पत्र दि.८/८/२००५.
१०) शासनाच्या ऊर्जा विभागाचे पत्र दि.२/९/२००५.
११) या कार्यालयाचे पत्र क्र.साप्रवि/रवका/३३५९२, दि.१८/१०/२००५.

---

स.सा.आदेश क्र.१२०(क) दि. १/७/१९८९ अनुसार दुर्गम भागात व प्रशासकीय परिपत्रक क्र.३७८, दि.२९/१/२००३ व त्या सोबतच्या सामान्य प्रशासन विभागांचा दिनांक ६/८/२००२ च्या शासन निर्णयामध्ये दिलेल्या सूचनांनुसार नक्षलग्रस्त व अतिसंवेदनशील भागात कार्यरत असणा-या पूर्वीच्या म.रा.वि.मंडळातील कर्मचा-यांना वेळोवेळी निर्गमित केलेल्या उपर्युक्त संदर्भिय पत्रान्वये 'प्रोत्साहन भत्ता व इतर सवलती' लागू करण्यात आल्या आहेत.

२. आता शासनाचे उप सचिव, गृह विभाग (विशेष) यांचा संदर्भिय दि. २०/५/२००५ च्या शासन निर्णयान्वये गोंदिया जिल्ह्यातील 'गोंदिया' तालुका नक्षलग्रस्त म्हणून घोषित करण्यात आला आहे. त्यामुळे गोंदिया जिल्ह्याच्या 'गोंदिया' तालुक्यामध्ये कार्यरत असलेल्या म.रा.वी.वितरण कंपनीच्या कर्मचा-यांना शासनाच्या ऊर्जा विभागाकडून संदर्भिय क्र. ९ च्या पत्रान्वये मिळालेल्या खुलाशानुसार गृहविभागाच्या शासन निर्णयाच्या तारखेपासून म्हणजेच दिनांक २०/५/२००५ पासून शासनाकडून पुढील आदेश प्राप्त होई पर्यंत 'प्रोत्साहन भत्ता व इतर सवलती' लागू करण्यात येत आहेत.

३. सदर प्रोत्साहन भत्ता संबंधित कर्मचा-यांच्या मूळ वेतनाच्या १५ टक्के दराने परंतु किमान रू.२००/- व कमाल रू.१५००/- यापैकी कमी असलेल्या रकमेइतका देय होईल.

४. म.रा.वि.मंडळाच्या पुनर्रचनेमुळे किंवा इतर कारणांमुळे गोंदिया तालुक्याच्या बाहेरील कार्यालयांमध्ये पदस्थापना झालेल्या/सेवा निवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांना लागू असलेल्या विशिष्ट कालावधीकरिता प्रोत्साहन भत्ता देय करणेबाबत संबंधित कार्यालयांनी परस्परांशी थेट संपर्क साधावा.

५. हे प्रशासकीय परिपत्रक वित्त शाखेच्या तसेच संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्या सहमतीने व्यवस्थापकीय संचालक (म.रा.वी.कं.म) यांनी दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

मुख्य महाव्यवस्थापक(कर्मचारीवर्ग)

प्रत :

विभागीय व त्यावरील स्तराच्या कार्यालयांना
म.रा.वीज वितरण कंपनी मर्या.च्या प्रेषण यादीनुसार.